ई-मेल व्दारे


अन्न बहु कुर्वीत तद् व्रतम्

**महाराष्ट्र शासन**
**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,**
**जिल्हा -अहमदनगर.**
**कार्यालय :- कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.**

☎ ०२४२६-२४३२१६
०२४२६-२४३८१६
email registrar.mpkv@nic.in

पत्ता :- मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
जिल्हा- अहमदनगर-४१३७२२.


जा.क्र. प्रशा.अ-१/अं.गु.मु.क./म.फु.कृ.वि./ १०१८ /२०२१ दिनांक : ०६/०४/२०२१

वाचा :- १. कृषि परिषद, पुणे यांच्या ९० व्या बैठकीतील विषय क्र. ४६/९०/२०१५ दिनांक १३.०२.२०१५
२. सहसंचालक (प्रशासन) कृषि परिषद पुणे यांचे पत्र जा.क्र. मकृप/आस्था-२/मकृवि/९३०/२०१६, दिनांक २७.०४.२०१६
३. विद्यापीठ आदेश (इंग्रजी) No. Admn. A-१/IQAC/MPKV/४८९/२०१९

## आदेश

विद्यापीठ अनुदान आयोग संहिता-२०१० नियम क्रमांक ६.०.११ मध्ये विद्यापीठस्तरीय अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन कक्ष स्थापन करणे बाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार No. Admn. A-२/IQAC/ MPKV/१९८ /२०१४ दिनांक ०४.०३.२०१४ अन्वये अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन कक्षाची स्थापना करण्यात आलेली होती.

सहसंचालक (प्रशासन), कृषि परिषद, पुणे यांनी त्यांचे पत्र जा. क्र. मकृप/आस्था-२/मकृवि/९३०/२०१६ दिनांक २७.०४.२०१६ नुसार क्र. मकृप/बैठक क्रमांक ९० विषय क्रमांक४६ ठराव क्रमांक ४०/९०/२०१५. दिनांक १३.०२.२०१५ मधील ठरावानुसार विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन कक्षाची (Internal Quality Assurance Cell) नव्याने संरचना करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

प्राप्त निर्देशानुसार कृषि परिषदेने अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन कक्षाचा कार्यकाळ २ वर्षाचा निश्चित केलेला आहे. त्यानुसार विद्यापीठ आदेश क्रमांक No. Admn. A-१/IQAC/ MPKV/४८९ /२०१९ दिनांक १२.०२.२०१९ नुसार गठीत केलेल्या अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन कक्षाचा कार्यकाळ संपलेला असल्यामुळे नव्याने अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन कक्षाची स्थापना करणे आवश्यक आहे.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत खालील प्रमाणे विद्यापीठस्तरीय अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन कक्षाची स्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | | समिती मधील पद |
|---|---|---|---|
| १. | मा. कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | | अध्यक्ष |
| २. | अधिष्ठाता, (कृषि) तथा संचालक शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | | सदस्य |
| ३. | संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | | सदस्य |
| ४. | संचालक विस्तार शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | | सदस्य |
| ५. | डॉ. पी. एन. रसाळ | सहयोगी अधिष्ठाता, पदव्युत्तर महाविद्यालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | सदस्य |
| ६. | डॉ. एस. ए. रणपिसे | विभाग प्रमुख, उद्यानविद्या, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | डॉ. यु. डी. चव्हाण | विभाग प्रमुख, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | सदस्य |
| ८. | डॉ. व्ही. एस. सुपे | प्राध्यापक, उद्यानविद्या, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | सदस्य |
| ९. | डॉ. एम. एस. माने | प्राध्यापक आणि प्रमुख, आंतरविद्या जलसिंचन, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | सदस्य |
| १०. | डॉ. पी. एम. हळदनकर | संशोधन संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली. | बहिस्थः तज्ञ |
| ११. | डॉ. यु. एम. खोडके | सहयोगी अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विद्यालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी. | बहिस्थः तज्ञ |
| १२. | डॉ. अे. डी. जाधव | समन्वयक, रेशीम उद्योगासाठीचे उत्कृष्टता आणि संगोपन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | बहिस्थः तज्ञ |
| १३. | कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | | सदस्य सचिव |

उपरोक्त गठीत कक्षाने विद्यापीठ अनुदान आयोग, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांची कार्यक्षमताआधारीत मुल्यांकन पद्धती (PBAS) प्रमाणे गुणवत्ता मुल्यांकन करुन अहवाल कुलसचिव कार्यालयाकडे सादर करावा.

आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासुन दोन वर्षासाठी सदर समिती कार्यान्वीत राहील.

मा. कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने.

(मोहन वाघ)
कुलसचिव

प्रत:

१. अधिष्ठाता, (कृषि) तथा संचालक शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
२. संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
३. संचालक विस्तार शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
४. सहयोगी अधिष्ठाता, पदव्युत्तर महाविद्यालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
५. विभाग प्रमुख, उद्यानविद्या, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
६. विभाग प्रमुख, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
७. प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
८. प्राध्यापक आणि प्रमुख, आंतरविद्या जलसिंचन, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
९. कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
१०. कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
११. समन्वयक, रेशीम उद्योगासाठीचे उत्कृष्टता आणि संगोपन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रत माहीतीसाठी:

१. मा. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, म.फु.कृ.वि., राहुरी.
२. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, म.फु.कृ.वि., राहुरी.

अन्न बहु कुर्वीत तद् व्रतम्

महाराष्ट्र शासन
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
कार्यालय- कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२१६
फॅक्स क्र. ०२४२६-२४३८१६
ई-मेल registrar.mpkv@nic.in

पत्ता :- मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी,
जि. अहमदनगर. पिन- ४१३ ७२२.

## दिनांक ०५/०५/२०२१ रोजी झालेल्या अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन कक्ष (IQAC) समितीच्या दहाव्या सभेचा इतिवृतांत...

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन कक्ष (IQAC) समितीची बैठक मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०५.०५.२०२१ रोजी सकाळी १०:०० वाजता सहयोगी अधिष्ठाता, डॉ. आण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी येथील सभागृह येथे आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस समितीचे खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. डॉ. प्रशांतकुमार पाटील,<br>कुलगुरु | अध्यक्ष |
| २. | डॉ. अशोक फरांदे<br>अधिष्ठाता, (कृषि) तथा संचालक शिक्षण | सदस्य |
| ३. | मा. डॉ. शरद गडाख<br>संशोधन संचालक, मफुकृवि, राहुरी | सदस्य |
| ४. | मा. डॉ. शरद गडाख<br>संचालक विस्तार शिक्षण ,मफुकृवि, राहुरी | सदस्य |
| ५. | डॉ. प्रमोद रसाळ<br>सहयोगी अधिष्ठाता, (पम) मफुकृवि, राहुरी | सदस्य |
| ६. | डॉ. श्रीमंत रणपिसे,<br>विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग, मफुकृवि, राहुरी | सदस्य |
| ७. | डॉ. यु. डी. चव्हाण<br>विभाग प्रमुख, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान, मफुकृवि, राहुरी | सदस्य |
| ८. | डॉ. व्ही. एस. सुपे<br>प्राध्यापक, उद्यानविद्या, सहयोगी संशोधन संचालक, गणेशखिंड, पुणे | सदस्य |
| ९. | डॉ. महानंद माने<br>प्राध्यापक आणि प्रमुख, आंतरविद्या जलसिंचन, मफुकृवि, राहुरी | सदस्य |
| १०. | डॉ. पी. एम. हळदनकर<br>संशोधन संचालक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली. | बहिस्थ:तज्ञ |
| ११. | डॉ. यु. एम. खोडके<br>सहयोगी अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विद्यालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, | बहिस्थ: तज्ञ |

परभणी.

१२. डॉ. ओ. डी. जाधव — बहिरस्थ : तज्ञ

समन्वयक, रेशीम उद्योगासाठीचे उत्कृष्टता आणि संगोपन केंद्र,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर

१३. डॉ. महानंद माने — सदस्य सचिव

कुलसचिव

बैठकीच्या प्रारंभी डॉ. महानंद माने, कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी मा. कुलगुरु तथा अध्यक्ष व उपस्थित सर्व सदस्यांचे औपचारिक स्वागत केले. तद्नंतर, मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीचे कामकाज सुरु करण्यात आले व खालील विषय सादर करण्यात आले -.

| | |
|---|---|
| **विषय क्र. १** | **दिनांक ०९ सप्टेंबर,२०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे...** |

दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तांचे वाचन सभागृहात करण्यात आले. त्या अनुषंगाने, कुलसचिव तथा सदस्य यांनी उपस्थित सदस्यांच्या याबाबत काही दुरुस्त्या / सूचना असल्यास त्या सूचविण्याबाबत विनंती केली.

**निर्णय:** **त्यानुसार ९ सप्टेंबर, २०१९ रोजी झालेल्या बैठकीतील विषय क्र.४ बाबत सभागृहात चर्चा करण्यात येवून "महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० मधील प्रथम सुधारणा दिनांक २५/०३/२०१४ पान क्रमांक ११ वरील तक्ता १(ब) च्या तरतुदी नुसार" जी पदे यापुर्वी यात समाविष्ट नाही" अशा पदांकरीता Category I व II च्या API मधुन सुट देण्यास हरकत नाही, परंतु Category III करीता ही सुट देता येणार नाही".**

**उपरोक्त तक्त्यात उल्लेख नसलेल्या परंतु कुलसचिवांच्या आदेशान्वये प्रसारण किंवा तत्सम विभागात सेवा करणाऱ्या प्राध्यापक वर्गीय कर्मचाऱ्यांना API Category I & II मधून सुट देण्यात येईल असा निर्णय समितीने घेतला.**

**(कार्यवाही- उप-कुलसचिव (प्रशासन), मफुकृवि, राहुरी)**

| | |
|---|---|
| **विषय क्र. २** | **दिनांक ०९ सप्टेंबर,२०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तावरील कार्यवाही अहवाल.** |

दिनांक ०९ सप्टेंबर,२०१९ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तावरील कार्यवाही अहवाल कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी सभागृहास सादर केला.

कार्यवाही अहवालमधील विषय क्र. ४ चे कार्यवाही अहवालाबाबत सभागृहात पुन:श्च चर्चा करण्यात आली व दिनांक ०९ सप्टेंबर,२०१९ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये त्याबाबत वरील प्रामाणे दुरुस्ती सुचविण्यात आली.

| | |
|---|---|
| **विषय क्र. ३** | **CAS अंतर्गत प्रशिक्षण दिनांक ३१.१२.२०१८ पुर्वी पुर्ण केलेले असेल त्यांना मुल्यांकन कालावधी दिनांकास पात्र करणेबाबत.** |

सदर प्रकरणी विद्यापीठ प्रशासन विभागाने सविस्तर टिप्पणी सादर केली. त्यानुसार महाराष्ट्र शासन पत्र क्र. संकिर्ण १५१९ / प्र. क्र. ९४ / ६ओ दिनांक २०.०७.२०१९ (पृ.क्र.१/प) व विद्यापीठ अनुदान आयोग पत्र क्रमांक

F No. २-१६/२००२(PS)Pt FI.II Dated १६.१०.२०१८ (पृ. क्र.५/प) मध्ये नमुद केले प्रमाणे ज्या अधिकाऱ्यांनी कारकीर्द प्रगत योजने (CAS) अंतर्गत टप्पा क्र. १ ते २ अे. जी. पी. रु. ६०००/- ते ७०००/- टप्पा क्र. २ ते ३ अे. जी. पी. रु. ७०००/- ते ८०००/- व टप्पा क्र. ३ ते ४ अे. जी. पी. रु. ८०००/- ते ९०००/- च्या पात्रतेसाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण दिनांक ३१.१२.२०१८ पुर्वी पुर्ण केलेले असेल त्यांना प्रशिक्षण पुर्ण केलेल्या दिनांकास पात्र करण्याऐवजी त्यांना मुल्यांकन कालावधी ज्या दिनांकास पुर्ण होतो त्या दिनांकास पात्र करण्यात यावे असे सुचित केले आहे. सदर बाबीस अनुसरुन विद्यापीठाच्या अधिनस्त कार्यरत असणाऱ्या शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांकडून त्यांचे हरकती मागवण्यात आलेल्या होत्या. त्यास प्रतिसाद देऊन एकुण १२६ शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या अभिप्राय/हरकती प्रशासनाकडे जमा झालेल्या आहेत.

सबब, त्या अनुशंगाने शासन पत्र व विद्यापीठ अनुदान आयोग यांचे पत्र संदर्भासाठी व पुढील निर्णयार्थ सोबत जोडण्यात आलेले असल्याचे समितीच्या निदर्शनास आणुन दिले.

उपरोक्त बाबी विचारात घेता चर्चेअंती समितीने खालील निर्णय घेतला

**निर्णय :** **महाराष्ट्र शासन पत्र क्र. संकिर्ण १५१९ / प्र. क्र. ९४ / ६अे कृषि दुग्धव्यवसाय विकास व पशुसंवर्धन मत्स्यव्यवसाय विभाग यांचे दिनांक २०.०७.२०१९ चे पत्र व विद्यापीठ अनुदान आयोग पत्र क्रमांक F No. २-१६/२००२(PS)Pt FI.II Dated १६.१०.२०१८ नुसार ज्या शिक्षकवर्गिय अधिकाऱ्यानी ३१.१२.२०१८ पर्यंत आवश्यक प्रशिक्षण पुर्ण केले असेल त्यांना त्यांचे देय दिनांकास पात्र करण्याबाबत समितीने मान्यता दिली.**

**(कार्यवाही- उप-कुलसचिव (प्रशासन), मफुकृवि, राहुरी)**

| **विषय क्र: ४** | **आचार्य पदवी धारण करत नसलेल्या शिक्षकवर्गीय अधिकारी यांचे सहयोगी प्राध्यापक हे पदनाम रद्द करणेबाबत.** |
|---|---|

सदर प्रकरणी विद्यापीठ प्रशासन विभागाने सविस्तर टिप्पणी सादर केली. त्यानुसार अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन कक्ष समितीची महात्मा फुले कृषि विद्यापीठात प्रथम स्थापना झाल्यानंतर विद्यापीठाच्या अधिनस्त कार्यरत असणाऱ्या शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांकडून कारकीर्द प्रगत योजने (CAS) अंतर्गत विविध टप्प्यांसाठी परिचय पत्र मागविण्यात आले होते. सदर प्राप्त अर्जांची पडताळणी करुन टप्पा क्रमांक १ ते २, २ ते ३ व ३ ते ४ चे आदेश दिनांक १६.०३.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेले होते. कारकीर्द प्रगत योजना (CAS) साठी पडताळणी करुन आदेश निर्गमित करण्याची ती पहिलीच वेळ असल्याने त्यात नजर चुकीने टप्पा क्रमांक ३ ते ४ (अे जी पी ९०००/-)साठी सर्व पात्र शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांना सहयोगी प्राध्यापक हे पदनाम देण्यात आले आहे. परंतु शासन निर्णय दिनांक १८.०३.२०१० व ICAR चे दिनांक ०६.०३.२००९ चे पत्रानुसार जर संबंधीत शिक्षकवर्गीय अधिकाऱ्याने त्याची आचार्य पदवी मुल्यांकन कालावधीत/कालावधी पुर्वी धारण केलेली असेल तरच त्यास सहयोगी प्राध्यापक हे पदनाम देता येते. जर एखाद्या शिक्षकवर्गीय अधिकाऱ्याने मुल्यांकन कालावधी नंतर आचार्य पदवी धारण केलेली असेल तर त्यास अे जी पी ९०००/- हा मुल्यांकन कालावधी नंतर व सहयोगी प्राध्यापक हे पदनाम आचार्य पदवी धारण केलेल्या दिनांकास लागु करणे बाबत प्रावधान असल्याचे समितीच्या निदर्शनास आणुन दिले.

सबब, ज्या शिक्षक वर्गीय अधिकाऱ्यांनी आचार्य पदवी धारण केलेली नाही त्यांचे सहयोगी प्राध्यापक हे पदनाम रद्द करुन तसे सुधारीत आदेश निर्गमित करण्यासाठी अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन कक्ष समिती समोर विषय सादर करण्यात येत असुन जेणेकरुन ही बाब निकाली काढणे सोईचे होईल. अशी समितीस विनंती केली. (सोबत शासन निर्णय व ICAR चे पत्र समितीस सादर केले )

उपरोक्त बाबी विचारात घेता चर्चेअंती समितीने खालील निर्णय घेतला

**निर्णय :** विद्यापीठ आदेश क्र Admn.A-६/CAS/StegeIV/६१७/of२०१७ Date १६.०३.२०१७ रोजीच्या आदेशात ज्या शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांना आचार्य पदवी धारण न करता CAS अंतर्गत सहयोगी प्राध्यापक हे पदनाम देण्यात आले होते. ते रद्द करण्यास समितीने मान्यता दिली.

(कार्यवाही- उप-कुलसचिव (प्रशासन), मफुकृवि, राहुरी)

| विषय क्र: ५ | कारकीर्द प्रगत योजने (CAS) अंतर्गत परिचय पत्र (Bio data) मागविणेबाबत. |
|---|---|

सदर प्रकरणी विद्यापीठ प्रशासन विभागाने कारकीर्द प्रगत योजने (CAS) अंतर्गत विवीध टप्प्यांसाठी परिचय पत्र (Bio data) मागविण्यासाठी अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन कक्ष समितीची माण्यता मिळणे बाबत विनंती केली.

उपरोक्त बाबी विचारात घेता चर्चेअंती समितीने खालील निर्णय घेतला

**निर्णय :** **कारकीर्द प्रगत योजनेचे (CAS) अंतर्गत परिचय पत्र (Bio-data) मागविणे करीता समितीने सर्वानुमते मान्यता दिली.**

(कार्यवाही- उप-कुलसचिव (प्रशासन), मफुकृवि, राहुरी)

**मा. अध्यक्षांच्या परवाणगीने खालील ऐनवेळेसचे विषय समिती समोर सादर करण्यात आले.**

| विषय क्र: १ | शैक्षणिक गुणवत्ता निर्देशक (API) तपासुन घेणे बाबतचा कालावधी निश्चित करणे. |
|---|---|

कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी समिती समोर शैक्षणिक गुणवत्ता निर्देशक (API) तपासणीसाठी कालावधी निश्चित करणेबाबत सभागृहास विनंती केली.

चर्चेअंती समितीने खालील निर्णय घेतला

**निर्णय :** **शैक्षणिक गुणवत्ता निर्देशक (API) तपासणी हि दर सहामाही / वार्षिक पध्दतीने करणेबाबत समितीने मान्यता दिली.**

(कार्यवाही - उपकुलसचिव (प्रशासन), मफुकृवि, राहुरी)

बैठकीच्या शेवटी डॉ. महानंद माने, सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

**मा. कुलगुरु यांचे मान्यतेने**

( महानंद माने )
सदस्य सचिव तथा कुलसचिव
म.फु.कृ.वि.,राहुरी

जा.क्र.प्रशासन/स्विस/IQAC/१० वी बैठक/इतिवृत्तांत/१३५८/२०२१ दिनांक १४.०५.२०२१

प्रत - मा. अध्यक्ष / सर्व सन्माननीय सदस्य / बहिस्थ : तज्ञ यांना माहितीस्तव सादर.

प्रत - उपकुलसचिव (प्रशासन), मफुकृवि, राहुरी यांना आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना